# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **दिलेलं आश्वासन कालावधीच्या आत पूर्ण केल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांचा नागरिकांनी केला महापालिका मुख्य कार्यालयात सन्मान**

दिनांक ०५ जुलै २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची एस.के.डी. बिल्डिंग येथील रहिवाश्यांनी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांचा मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात सन्मान केला. सदर प्रसंगी पत्रकार बंधू व नागरिक उपस्थित होते.

पिनॅकॉलो बिल्डिंग समोरील महापालिकेच्या पिनॅकॉलो बिल्डिंग समोरील एस.के.डी. बिल्डिंगमध्ये BSUP योजने अंतर्गत व रस्ता रुंदीकरणमध्ये घर गेलेल्या नागरिकांना निवारा देण्यात आलेला आहे. तेथील नागरिकांना लिफ्ट बंद, अस्वच्छता, गटाराचे पाणी, पाण्याच्या टाकीत घाण या सर्व समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्या इमारतीमधील नागरिकांच्या तक्रारी व मिरा भाईंदर शहरातील पत्रकारांच्या माहितीनुसार मा. आयुक्त यांनी सदर ठिकाणी भेट देऊन आढावा घेतला व अतिशय बिकट परिस्थितीत राहणाऱ्या नागरिकांना त्यांच्या मागणीनुसार सर्व कामे पूर्ण करून त्यांचे समाधान केले जाईल असे आश्वासन मा. आयुक्त यांनी नागरिकांना दिले. नागरिकांना दिलेले आश्वासन व मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार सदर इमारतीमध्ये लिफ्ट बंदची समस्या, अस्वच्छता असलेल्या ठिकाणी व पाण्याच्या टाकीची स्वच्छता, गटारांची स्वच्छता, परिसरातील साफसफाई तीन दिवसांमध्ये पूर्ण करण्यात आली. दिलेल्या आश्वासनानुसार मा. आयुक्त यांनी नागरिकांच्या समस्यांचे निवारण केल्याने एस.के.डी. इमारतीमधील नागरिकांनी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांची महापालिका मुख्यालयात भेट घेऊन त्यांचा सन्मान करून त्यांचे आभार व्यक्त केले.